# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO 9001:2008) (ISO/IEC 27001:2013)

४ था मजला, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.

दू.क्र. : २६४७१२५५/२६४७८५३१ फॅक्स : ०२२-२६४७३९८०

Website : www.msbte.com


# नागरिकांची सनद

# नागरिकांची सनद

## प्रस्तावना :-

उद्योगधंदे समूहाला लागणारे तांत्रिक मनुष्यबळ व रोजगार निर्मितीच्या दृष्टीकोनातून कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी अनेक पदविका अभ्यासक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या जीवनात मूलगामी बदल घडविणारे महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ हे महाराष्ट्र शासनाचे स्वायत्त मंडळ आहे.

शैक्षणिक अभ्यासक्रम तयार करताना व राबविताना उद्योगसमूहांच्या गरजांनुसार त्यात लवचिकता आणता यावी यासाठी शासनाने महाराष्ट्र अधिनियम-३८/१९९७ नुसार मंडळाला स्वायत्त दर्जा प्रदान केला आहे. मंडळाच्या भौगोलिक सीमा पुर्ण राज्य असून मंडळाचे मुख्य कार्यालय मुंबई येथे तर पुणे, औरंगाबाद, नागपूर व मुंबई अशी चार विभागीय कार्यालये कार्यरत आहेत. मंडळाची नियामक परिषद २००३ मध्ये अधिकारारुढ झाली. महाराष्ट्राचे मंत्री (उच्च व तंत्रशिक्षण) हे ह्या परिषदेचे पदसिद्ध अध्यक्ष तर राज्यमंत्री (उच्च व तंत्रशिक्षण) हे उपाध्यक्ष आहेत.

मंडळाने त्याचे कार्यक्षेत्र केवळ परिक्षेपुरते मर्यादीत न ठेवता नियोजनबद्ध पद्धतीने इतर विविध शैक्षणिक उपक्रम हाती घेतले आहेत. अर्थात यासाठी नियामक मंडळ व नियामक परीषदेने केलेले मोलाचे मार्गदर्शन, मंडळातील सर्व अधिकारी व कर्मचारी, मंडळाशी संलग्न संस्थांचे प्राचार्य, प्राध्यापक आणि इतर कर्मचाऱ्यांची साथ देखील आहेच.

मंडळाशी महाराष्ट्रातील १०७८ तंत्रनिकेतने व इतर तांत्रिक संस्था संलग्न असून मंडळातर्फे १८८ पदविका अभ्यासक्रम राबविले जातात. मंडळ दरवर्षी दोन सत्रात प्रत्येकी सात लाखापेक्षा जास्त विद्यार्थ्यांच्या विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा घेते व ४५ दिवसांच्या आत संगणकीय तंत्रज्ञानाच्या आधारे निकाल घोषित करते. यासोबतच मंडळ दरवर्षी सधारणपणे ८ लाख विद्यार्थ्यांच्या Online M.S.C.I.T. परीक्षा घेते व त्वरित निकाल देते.

मंडळाने दर्जेदार शैक्षणिक साहित्य निर्मितीसुद्धा केलेली आहे. तसेच उद्योगधंद्यांच्या गरजांनुसार रोजगार निर्मितीला पोषक अनेक नवीन अभ्यासक्रम दरवर्षी तयार केले जातात. मंडळ जवळपास पेपरलेस ऑफीसप्रमाणे काम करीत आहे. संलग्न संस्थांचा व मंडळाचा संबंध मुख्यत्वे वेबसाईटद्वारे ऑनलाईन पध्दतीने होतो. त्यामुळे जलद संपर्क होतोच शिवाय मंडळाच्या प्रणालीची कार्यक्षमता सुद्धा वाढली आहे.

उत्कृष्ट अभ्यासक्रम, प्रभावी अंमलबजावणी, शैक्षणिक अवेक्षण, शिस्तबद्ध परीक्षा पद्धती ही मंडळाचे धोरण असून मंडळामध्ये शिस्तबद्ध राबवित असलेल्या प्रणालीकरिता मंडळाला ISO ९००१ : २००८ हे प्रमाणपत्र मिळाले आहे. परिक्षा घेणे व निकाल घोषित करणे तसेच प्रमाणपत्र प्रदान करणे या बाबी अत्यंत पारदर्शकपणे व सचोटीपुर्ण राबविणे आवश्यक आहे. मंडळाने याविषयी अंगिकारलेली पद्धत पाहून मंडळाला ISO २७००१ : २०१३ हे सिक्युरीटी प्रमाणपत्र मिळाले आहे.

मंडळाच्या अभ्यासक्रमाची आणि कामकाजाची विस्तृत महिती www.msbte.com ह्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाची रचना




## Organizational Structure



## महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ तसेच त्यांच्या अधिपत्याखाली ४ विभागीय कार्यालये कार्यरत असून, त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कार्यालयाचे नांव व पत्ता | दूरध्वनी क्रमांक व ई-मेल | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|
| १. | महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४ था मजला, ४९ खेरवाडी, वांद्रे ( पूर्व), मुंबई ४०० ०५१<br>मुख्य कार्यालय | दूरध्वनी ०२२-२६४७१२५५/ २७४७८५३१<br>फॅक्स ०२२ २६४७३९८०<br>E- mail: secretary@msbte.com | संपूर्ण राज्य |
| २. | महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, २ रा मजला, ४९ खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१ | दूरध्वनी ०२२-२६४७३२५३/५४<br>फॅक्स ०२२ -२६४७३२५४<br>E- mail: rbtemumbai @msbte.com | मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर जिल्हे |
| ३. | महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, ४१२-ई शिवाजी नगर, बहिरट पाटील चौक, पुणे – ४११ ०१६ | दूरध्वनी ०२०- २५६५६९९४ २५६६०३१९<br>फॅक्स ०२०- २५६५२३०८<br>E-mail: rbtepn@msbte.com | पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर जिल्हे |
| ४. | महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, उस्मानपुरा, स्टेशन रोड, औरंगाबाद- ४३१ ००५ | दूरध्वनी ०२४०-२३३१२७३/ २३३४०२५<br>फॅक्स २०४०-२३४९६६९<br>E-mail:rbteau@msbte.com | औरंगाबाद, जालना, हिंगोली, नांदेड, परभणी, लातूर, उस्मानाबाद, बीड, नाशिक, जळगांव, धुळे, अहमदनगर, नंदुरबार जिल्हे |
| ५. | महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर बाजार, नागपूर – ४४० ००१ | दूरध्वनी ०७१२- २५६०३५० २४६४८३६<br>फॅक्स ०७१२ – २५६०३५०<br>E-mail: rbteng@msbte.com | नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, वाशिम, अकोला, बुलढाणा जिल्हे |

**महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळांतर्गत विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था व प्रवेशक्षमता याबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे. (सन २०१५-१६)**

| **ऐआयसीटीई मान्यता प्राप्त पदविका संस्था** | | |
|---|---|---|
| **विभाग** | **संस्था** | **प्रवेश क्षमता** |
| औरंगाबाद | २८७ | ६५९१० |
| नागपूर | १६६ | ३७७२० |
| पुणे | २३५ | ५५८७० |
| मुंबई | ८८ | २१६७० |
| **एकूण** | **७७६** | **१८११७०** |

| **अल्प मुदतीचे अभ्यासक्रम (नॉन ऐआयसीटीई) राबविणा-या संस्था** | | |
|---|---|---|
| **विभाग** | **संस्था** | **प्रवेश क्षमता** |
| औरंगाबाद | ३१ | २७८५ |
| नागपूर | ७५ | ६३५० |
| पुणे | २३ | १८६५ |
| मुंबई | ४१ | ३३२५ |
| **एकूण** | **१७०** | **१४३२५** |

## खालील दस्तावेज मंडळाच्या संकेतस्थळावर (Website) उपलब्ध आहेत.

**१. MSBTE Act**

**२. Information Bouchure**

**३. MSBTE Newsletter**

**४. Academic Calendars**

**५. Application Forms**

**६. Curriculum**

**७ Tenders**

## मंडळामार्फत राबविण्यात येणारे विविध उपक्रम खालीलप्रमाणे आहेत :-

- **अभ्यासक्रम सुधारणा**

पदविका धारक विद्यार्थ्यांची रोजगार क्षमता वाढविण्याच्या उद्देशाने विद्यार्थांना बदलत्या तंत्रज्ञानाशी सुसंगत ज्ञान देणे आवश्यक असून त्याअनुषंगाने त्यांच्यामध्ये आवश्यक तांत्रिक व व्यक्तिमत्व विषयक कौशल्ये विकसित करण्यासाठी दर पाच वर्षांनी मंडळामार्फत अभ्यासक्रम सुधारणा केली जाते. यासाठी औद्योगिक क्षेत्रातील नामांकित व्यक्ती व शिक्षण तज्ञ यांच्या शोध सभा (Search Conference) घेऊन आधुनिक तंत्रज्ञान, उद्योगधंद्यांच्या काळानुसार बदलत्या गरजा, मार्केट सर्वे, जॉब ॲनालीसिस या सर्वांचा अभ्यास करुन शास्त्रोक्त पद्धतीने ही सुधारणा केली जाते. मंडळामार्फत OBE (**O**utcome **B**ase **E**ducation) पॅटर्नवर आधारित पदविका अभ्यासक्रमांच्या पाठ्यक्रम सुधारणेचे काम २०१५-१६ मध्ये सुरु झाले असून त्यास 'I-Scheme' असे नाव दिले आहे. या अभ्यासक्रमात कौशल्य विकास व उद्योजकता या मुद्यांवर विशेष भर देण्यात येत असून या अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थ्यांना ६ आठवडयाचे कारखान्यातील प्रशिक्षण घेणे अनिवार्य करण्यात येणार आहे. हा अभ्यासक्रम शिकविण्यासाठी इन्फॉर्मेशन ॲन्ड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी (ICT) पद्धतीचा वापर करण्यावर भर देण्यात येणार आहे. 'I' Scheme चा तयार झालेला अभ्यासक्रम शैक्षणिक तज्ञ तसेच उद्योगजगतातील तज्ञ यांचेकडून वैध करुन घेतला जात आहे. सदर अभ्यासक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी टिचर गाईड, नमुना प्रश्नपत्रिका तसेच प्रयोगशाळा पुस्तिका यांची रचना व निर्मिती करण्याचे मंडळामार्फत प्रस्तावित आहे.

- **नवीन अभ्यासक्रम तयार करणे**

औद्योगिक क्षेत्राच्या गरजेनुसार AICTE मान्यताप्राप्त तसेच शासन मान्यता असलेले अल्प मुदतीचे नवीन अभ्यासक्रम मंडळामार्फत तयार केले जातात. यामध्ये आर्किटेक्चर व इमारत बांधकाम, संगणक व माहिती तंत्रज्ञान, औद्यागिक सुरक्षा, व्यवस्थापन, सौंदर्यशास्त्र, निमवैद्यक शास्त्र, पर्यटन, फॅशन तंत्रज्ञान, विमा क्षेत्र, फांउड्री तंत्रज्ञान, मद्य तंत्रज्ञान इत्यादी अभ्यासक्रम तयार केले आहेत.

- **लॅब मॅन्युअल्स**

तंत्रशिक्षणातील प्रयोगांचे (Praticals) महत्व ओळखून प्रयोगशाळेतील कामकाजाचे सुसूत्रीकरण व त्यामध्ये एकसमानता आणण्याच्या उद्देशाने मंडळाने अभ्यासक्रमांशी निगडित प्रयोगशाळांसाठी लॅब मॅन्युअल्स तयार केले आहेत. लॅब मॅन्युअल्समुळे शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये काय शिकवायचे व काय शिकायचे याबद्दल एक पारदर्शकता आली आहे. यामुळे मंडळाशी संलग्नित सर्व संस्थांमधील विद्यार्थी एकसमान पद्धतीने प्रयोग करतात. लॅब मॅन्युअल्समध्ये अनिवार्य औद्योगिक भेटी, प्रात्यक्षिके, प्रयोग, सॉफ्टवेअर इत्यादी बाबींचा अंतर्भाव केलेला असून विद्यार्थ्यांच्या बुद्धीला चालना मिळावी यासाठी ब्रेन स्टॉर्मिंग प्रश्नांचा अंतर्भाव केला आहे. लॅब मॅन्युअल्समुळे प्रयोगशाळेत व कार्यशाळेत करावयाच्या कामामध्ये एकसुत्रता आली आहे आणि प्रयोगांचे प्रमाणिकरण (Standardization) झाले आहे.

- **ऑनलाईन परीक्षा**

मंडळातर्फे सध्या ५ विषयांच्या ऑनलाइन परिक्षा घेतल्या जातात व या विषयांच्या प्रश्नपेढ्या मंडळामार्फत तयार केल्या असून त्या दरवर्षी समृद्ध केल्या जातात. यापुढे ऑनलाईन परिक्षांमध्ये वाढ करण्याचा मंडळाचा मानस आहे.

- **शैक्षणिक अवेक्षण**

तंत्रशिक्षणाचा दर्जा जोपासण्याकरिता मंडळामार्फत प्रत्येक वर्षी मंडळाशी संलग्नित संस्थांचे CIAAN नॉर्मसचा वापर करुन शैक्षणिक अवेक्षण केले जाते. संस्थांमध्ये उपलब्ध सोयीसुविधा तसेच संस्थेमार्फत केले जाणारे शैक्षणिक कामकाज व विद्यार्थी आणि शिक्षकांच्या गुणवत्तेत वाढ करण्यासाठीच्या कार्यक्रमामध्ये किंवा त्यांच्या आयोजनामध्ये संस्थेचा सहभाग इत्यादीं बाबींची अवेक्षणामध्ये प्रामुख्याने तपासणी केली जाते. तसेच संस्थांमार्फत अभ्यासक्रमांची अंमलबजावणी, प्रयोगशाळांचा दर्जा, विद्यार्थ्यांचे नियमित मुल्यांकन, परीक्षांचे निकाल, शिक्षण साधनांचा प्रभावी वापर, विद्यार्थ्यांची उपस्थिती, ग्रंथालय सुविधा, शिक्षकांचा शैक्षणिक विकास तसेच विविध स्पर्धा, प्रशिक्षण इ. अन्य बाबींच्या आयोजनात अथवा त्यामध्ये क्रियाशील सहभाग या बाबींचे परिक्षण करुन त्यातील संस्थेच्या कामगिरीनुसार संस्थेच्या अभ्यासक्रमास ग्रेड दिली जाते. सन २०१६-१७ पासून अवेक्षणाचे परफॉर्मन्स इंडीकेटर्स NBA अॅक्रेडिटेशनच्या नियमांच्या अनुषंगाने बनविण्यात आले असून NBA अॅक्रेडिटेशनच्या नियमांच्या ७५% एवढ्या इंडीकेटर्सचा मंडळाच्या अवेक्षणाच्या मुद्यांमध्ये समावेश करण्यात आला आहे. तसेच अवेक्षणाचे गुण २०० वरून वाढवून २५० करण्यात आले आहेत. बदललेल्या अवेक्षण मुद्यांच्या अनुषंगाने अवेक्षण समिती प्रमुखांच्या कार्यशाळा प्रत्येक विभागीय कार्यालयामार्फत आयोजित करण्यात आल्या असून अवेक्षण अहवाल प्रत्यक्ष अवेक्षणाच्या दिवशी ज्या संस्थेचे अवेक्षण करण्यात येते त्याच संस्थेमधून ऑनलाईन पध्दतीने भरून घेण्यात येतात. मंडळामार्फत चालू असलेल्या नविन 'I' अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणीनंतर अवेक्षणांचे मुद्दे हे पुर्णतः NBA अॅक्रेडिटेशनच्या नियमांनुसार करण्याचा मंडळाचा मानस आहे. सदर अवेक्षणामध्ये निकृष्ठ दर्जा आढळून येणाऱ्या संस्थांच्या अभ्यासक्रमाचे संलग्निकरण मंडळामार्फत काढून घेण्याबाबतची कार्यवाही केली जाते.

- **अंदमान-निकोबार कंट्रोल्ड अॅकेडेमिक अॅटोनॉमी प्रकल्प**

अंदमान-निकोबार या केंद्रशासित प्रदेशातील पोर्टब्लेअर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पॉलिटेक्निक या शासकीय संस्थेला शैक्षणिक स्वायत्तता प्रदान झाल्यानंतर या संस्थेने पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी सन २००४ साली महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या संलग्नतेची निवड केली. तेव्हापासून या तंत्रनिकेतनात मंडळाचे अभ्यासक्रम राबविले जातात. या अभ्यासक्रमाच्या परीक्षा घेण्याची व निकाल

घोषित करण्याची संपूर्ण जबाबदारी मंडळाने स्विकारली आहे. या तंत्रनिकेतनातील विद्यार्थ्यांच्या काही प्रमाणात प्रशिक्षणाबाबतही मंडळाने सहकार्य केले आहे.

- **महाराष्ट्र स्टेट सर्टिफिकेट कोर्स इन इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (एम.एस.सी.आय.टी.) परिक्षा**

  एम.एस.सी.आय.टी. अभ्यासक्रम सन २००१ पासून महाराष्ट्र शासनामार्फत सुरु करण्यात आलेला असून मंडळ व महाराष्ट्र नॉलेज कार्पोरेशन लि. (MKCL) यांच्या संयुक्त भागीदारीत संपूर्ण राज्यामध्ये एम.एस.सी.आय.टी. परिक्षा घेण्याचे काम केले जाते. ही परिक्षा पूर्णत: ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येते. तसेच परीक्षा प्रवेशपत्राचे वाटप व निकाल ऑनलाईन पद्धतीने होते. एम.एस.सी.आय.टी. परिक्षा प्रत्येक महिन्यामध्ये आयोजित केली जाते. प्रत्येक वर्षी अंदाजे १० लाख विद्यार्थी या परिक्षेस बसतात. आतापर्यंत मंडळाने साधारणपणे १.१४ कोटीपेक्षा जास्त विद्यार्थ्यांची एम.एस.सी.आय.टी परीक्षा घेतली आहे.

- **करीअर फेअर्स आयोजित करणे**

  तंत्रशिक्षणाची माहिती ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याकरिता अधिकाधिक गावात दहावी व बारावीमधील विद्यार्थ्यांकरिता तंत्रशिक्षण मार्गदर्शन मेळावे (Career Fairs) आयोजित केले जातात. यामध्ये स्थळित (Static) व चालित (On-Wheel) अशा दोन प्रकारच्या मेळाव्यांचे आयोजन केले जाते. स्थळित मेळावे वर्षातून दोन टप्प्यांमध्ये (पहिला टप्पा मे-जून व दुसरा टप्पा ऑक्टोंबर- नोव्हेंबर मध्ये) तर चलित मेळावे डिसेंबर-जानेवारी मध्ये आयोजित केले जातात. प्रत्येक जिल्हातून २ स्थळित व २ चलित मेळाव्यांचे आयोजन मंडळाच्या विभागीय कार्यालयाच्या देखरेखीखाली पार पाडले जाते. मंडळाशी संलग्नीत संस्थांमार्फत या मेळाव्यांचे आयोजन केले जाते. मंडळामार्फत चालविले जाणारे विविध पदविका अभ्यासक्रम, प्रवेश प्रक्रिया, रोजगाराच्या संधी, उद्यमशीलता, पदविकोत्तर उच्च शिक्षणाच्या संधी, शासनाच्या शिष्यवृत्ती योजना, शैक्षणिक कर्ज, ॲपटिट्युट टेस्टींग, करियर नियोजन तसेच मंडळाचे विविध उपक्रम इत्यादींबाबत व्याख्याने, द्रक-श्राव्य चित्रफिती, प्रकल्प प्रदर्शन, चित्र रथ इत्यादीद्वारे विद्यार्थी व पालक यांना मार्गदर्शन व त्यांचे शंका निरसन केले जाते.

- **शिक्षकांचे प्रशिक्षण**

  पदविका अभ्यासक्रमांची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्यासाठी व पदविका प्राप्त विद्यार्थी उद्योग क्षेत्रात उपयुक्त ठरण्यासाठी मंडळामार्फत शिक्षकांसाठी खालील प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जातात.

  - **इंडस्ट्रीयल ट्रेनिंग**

    केवळ पुस्तकी ज्ञानावर अवलंबून न राहता शिक्षकांना प्रत्यक्ष कारखान्यामधील कामाचा अनुभव मिळावा यासाठी इंडस्ट्रीयल ट्रेनिंगसाठी पाठविले जाते. यामुळे शिक्षकांना कारखान्यामध्ये प्रत्यक्ष कामकाज कसे चालते याचा अनुभव मिळतो शिवाय त्यांच्यामध्ये इंडस्ट्रीअल कल्चर सुद्धा विकसित होते. तसेच अभ्यासक्रमात करण्यात आलेले तंत्रज्ञानातील बदल त्यांना कारखान्यामध्ये प्रत्यक्ष शॉप फ्लोअरवर अनुभवायला मिळतात. मंडळामार्फत रिलायन्स इन्फ्रा लि., एल.ॲन्ड टी. लि., टाटा कन्सल्टंन्सी सर्विसेस, सिमेन्स लि., फोर्स मार्शल, सुझलान लि., किर्लोस्कर ब्रदर्स लि. क्रॉम्पटन ग्रिव्हज लि., प्रसारभारती, हिंदुस्थान ॲन्टिबायोटिक्स लि., मराठवाडा ऑटो क्लस्टर, एन.आर.बी. बिअरिंग्ज, अशोक लेलंड लि., महिंन्द्रा ॲन्ड महिंन्द्रा, लुपिन इंडस्ट्रीज लि., ग्लॅक्सोस्मिथक्लिन (GSK) लि., केईसी इंटरनॅशनल, टाटा मोटर्स लि., M.S.E.T.C.L., राष्ट्रीय केमिकल्स ॲन्ड फर्टिलायझर्स इत्यादी कंपन्यांमध्ये तंत्रनिकेतनातील शिक्षकांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात येतात.

➢ **फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम्स (FDP)**

उद्योगधंद्यांच्या गरजेनुसार अभ्यासक्रमामध्ये वेळोवेळी बदल करण्यात येत असतात व त्याप्रमाणे शिक्षकांचे ज्ञान अद्ययावत करण्यासाठी फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम्स आयोजित केले जातात. यामध्ये नविन व प्रगत तंत्रज्ञान, तसेच अद्ययावत कार्यप्रणाली यासंबंधीत विषयांवर प्रशिक्षण देण्यात येते.

➢ **लाईफ स्कील ट्रेनिंग**

शिक्षकांमध्ये व्यक्तिमत्व विकास घडवून आणण्यासाठी शिक्षकांसाठी लाईफ स्कील ट्रेनिंग्स आयोजित केली जातात. यामुळे शिक्षकांमध्ये व्यावसायिकता निर्माण होण्यास मदत होते, जेणेकरुन ते पुढे विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिकता निर्माण करु शकतात. या प्रशिक्षणांद्वारे विद्यार्थ्यांना संभाषण कला, आत्मविश्वास, तणाव व्यवस्थापन, वेळेचे नियोजन, संस्थेविषयी आत्मिक बांधिलकी, सामाजिक जबाबदारीची जाणीव इत्यादी बाबींविषयी प्रशिक्षित करण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात येते.

➢ **इंडक्शन ट्रेनिंग**

इंडक्शन ट्रेनिंग प्रोग्रॅम फेज १ व फेज २ मध्ये टिचींग – लर्निग प्रोसेसबाबत प्रामुख्याने नविन शिक्षकांना प्रशिक्षित केले जाते. या प्रशिक्षणाचा उपयोग शैक्षणिक व्यवस्थापन उत्तम प्रकारे करण्यासाठी होतो, ज्यामुळे विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढण्यास मदत होते.

- **शिक्षकांना तांत्रिक पेपर सादरीकरणासाठी अर्थसहाय्य**

तंत्रनिकेतनांतील शिक्षकांना राष्ट्रीयस्तर तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर तांत्रिक पेपर सादर करण्यासाठी जाता यावे यासाठी मंडळामार्फत अर्थसहाय्य दिले जाते. या योजनेमुळे शिक्षकांना विविध शैक्षणिक तज्ञांशी संवाद साधण्याची संधी मिळून त्यांच्या ज्ञानामध्ये भर पडते. राष्ट्रीय स्तरासाठी रू. १०,०००/- तर आंतरराष्ट्रीय स्तरावर तांत्रिक पेपर सादरीकरण करण्यासाठी रू. २०,०००/- एवढी मदत शिक्षकांना दिली जाते.

- **विनाअनुदानित पदविका संस्थांमधील शिक्षकीय पदांना मान्यता देणे**

AICTE मान्यता प्राप्त विनाअनुदानित संस्थांमधील प्राचार्य, विभागप्रमुख व अधिव्याखाता पदांना दि. ०१.०४.२०१० पासून मंडळामार्फत मान्यता देण्यात येते. मार्च २०१६ पासून या पदांना ऑनलाईन पद्धतीने मान्यता देण्याची प्रक्रिया मंडळामार्फत अंमलात आणली आहे. संस्थांनी मंडळाकडे केलेल्या विनंती नुसार संस्थेला शिक्षकीय पदांची संख्या कळविण्यात येते. त्यानुसार संस्था बिंदुनामावली तयार करुन सहाय्यक आयुक्त (मावक) यांचेकडून अंतिम तपासणी करुन जाहिरात वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्याची व निवड समितीची परवानगीसाठी मंडळाकडे प्रस्ताव सादर करतात. मंडळ जाहिरातीस परवानगी देते व विभागीय कार्यालयास निवड समिती देण्याबाबत आदेश देण्यात येतो व त्या अन्वये मुलाखतीचा दिनांक ठरवून मुलाखती घेण्यात येतात. निवड समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांचे सर्व कागदपत्र नियमानुसार तपासून शिक्षकीय पदांना मंडळाकडून मान्यता देण्यात येते.

- **विद्यार्थ्यांकरिता विविध उपक्रम**

मंडळामार्फत विद्यार्थ्यांकरिता खालील उपक्रम राबविले जातात.

➢ **इनप्लांट ट्रेनिंग (BOAT च्या सहकार्याने)**

महाराष्ट्र राज्यातील मंडळाशी संलग्नीत संस्थामधील विद्यार्थ्यां साठी त्यांचे चौथे व सहावे सत्र संपल्यानंतर चार आठवड्यांचे औद्योगिक प्रशिक्षण मंडळामार्फत आयोजित करण्यात येते. या संदर्भात बोर्ड ऑफ ॲप्रेंटिस ट्रेनिंग (BOAT) यांच्या सहकार्याने ॲप्रेंटिस ट्रेनिंग स्किम या योजनेचा फायदा विद्यार्थ्यांना मंडळामार्फत करुन दिला जातो. हे प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण कालावधीसाठी

मानधन मिळते, प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानंतर त्यांना नैपुण्य प्रमाणपत्र मिळते तसेच सदर प्रशिक्षणाचा कालावधी हा कारखान्यातील अनुभव म्हणून ग्राह्य धरला जातो. या योजनेअंतर्गत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी कॉन्फडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रिज (CII) महाराष्ट्र स्टेट कौंसिल यांनी त्यांच्या सर्व सभासद कारखान्यांना आवाहन करून मंडळाला सहकार्य केले आहे.

### ➢ राज्यस्तरीय तांत्रिक पेपर सादरीकरण स्पर्धा

विद्यार्थ्यांनी, विद्यार्थीदशेतच तांत्रिक पेपर लिहिण्याचे व सादर करण्याचे कौशल्य जोपासावे, जेणेकरुन त्यांच्यामध्ये सेल्फ स्टडी टेक्निक्स, प्रेझेन्टेशन स्कील्स, इन्फॉरमेशन सर्च, रिसर्च ॲबिलीटीज इत्यादी गुण विकसित होतील व त्यांचा आत्मविश्वास वाढेल  या दृष्टीकोनातून विविध संस्थांमध्ये राज्यस्तरीय पेपर सादरीकरण स्पर्धा मंडळामार्फत आयोजित केल्या जातात. सिव्हील अभियांत्रिकी, संगणक अभियांत्रिकी, विद्युत अभियांत्रिकी, अणुविद्युत अभियांत्रिकी, यंत्र अभियांत्रिकी, औषध निर्माण व इतर अशा सात विषयांसाठी स्पर्धा आयोजित केल्या जातात. या स्पर्धांच्या आयोजनासाठी मंडळाच्या मुंबई व पुणे विभाग मिळून ७ संस्था तसेच नागपूर व औरंगाबाद मिळून ७ संस्था अशा एकंदर १४ संस्थांची निवड करण्यात येते. प्रत्येक स्पर्धेमधून तीन विजेत्यांची निवड तज्ञ परिक्षकांमार्फत करण्यात येऊन रोख बक्षिस व प्रशस्तिपत्रे देऊन विजेत्यांना सन्मानित केले जाते.

### ➢ राज्यस्तरीय तांत्रिक प्रश्नमंजुषा स्पर्धा

विद्यार्थ्यानी केवळ परीक्षा उत्तीर्ण होण्याच्या मर्यादित दृष्टीकोनातून ज्ञान संपादन न करता आपल्या क्षेत्रातील इतर अनुषंगिक ज्ञान सुध्दा मिळवावे, याकरिता विविध संस्थांमध्ये राज्यस्तरीय तांत्रिक प्रश्नमंजुषा स्पर्धांचे आयोजन मंडळामार्फत केले जाते. सिव्हील अभियांत्रिकी, संगणक अभियांत्रिकी, विद्युत अभियांत्रिकी, अणुविद्युत अभियांत्रिकी, यंत्र अभियांत्रिकी व औषधनिर्माण अशा सहा विषयांसाठी या स्पर्धा आयोजित केल्या जातात. प्रत्येक विषयांसाठी राज्यातून एका संस्थेची आयोजनासाठी निवड केली जाते. तज्ञ शिक्षकांच्या मार्गदर्शनासाठी संबंधित विषयाची प्रश्नावली तयार करून त्यातून अधिकाअधिक प्रश्नांची अचुक उत्तरे देणाऱ्या स्पर्धकांची निवड केली जाते. विजेत्या स्पर्धकांना रोख बक्षिस व प्रशस्तिपत्रक देऊन सन्मानित करण्यात येते.

### ➢ प्रकल्प सादरीकरण स्पर्धा

मंडळामार्फत सन २०११-१२ पासून विद्यार्थ्यांकरिता प्रकल्प सादरीकरण स्पर्धा सुरु करण्यात आलेली आहे.  समाजास उपयुक्त अशा विषयावर संशोधनात्मक प्रकल्प तयार करण्याची प्रेरणा विद्यार्थ्यांमध्ये वृध्दिंगत व्हावी या उद्देशाने विविध संस्थांमध्ये राज्यस्तरीय स्पर्धांचे आयोजन केले जाते. या स्पर्धांच्या नियोजनासाठी प्रत्येक विभागातून एक याप्रमाणे एकूण चार संस्थांची निवड मंडळामार्फत केली जाते. विद्यार्थ्यांनी त्यांच्या अभ्यासक्रमाच्या शेवटच्या वर्षात बनविलेल्या प्रकल्पांमधून उत्कृष्ट प्रकल्पाची शिफारस संस्थेकडून केली जाते. अशा प्रकल्पांचे प्रदर्शन स्पर्धेच्या ठिकाणी भरवले जाते. कारखाने व नावाजलेल्या संस्थांमध्ये संशोधन काम करणा-या तज्ञांच्या समितीमार्फत सर्व प्रकल्पांचे तुलनात्मक परिक्षण करून त्यातून विजेते घोषित केले जातात. प्रत्येक विभागातून प्रथम क्रमांकाच्या विजेत्या प्रकल्पास ७५,००० रूपयांचे प्रथम पारितोषिक तर द्वितीय क्रमांकास ४१,००० रुपयांचे पारितोषिक व प्रशस्तिपत्रे देऊन मंडळामार्फत सन्मानित करण्यात येतात.

### ➢ पेटेंटींग

प्रकल्प सादरीकरण स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी केलेल्या संशोधनात्मक प्रकल्पांचे पेटेंटींग केले जाते. या समितीमध्ये कारखान्यांमध्ये व नावाजलेल्या संस्थांमध्ये संशोधन कार्य करणाऱ्या तज्ञांचा समावेश असतो. ज्या प्रकल्पांसाठी पेटेंट मिळण्याची शक्यता आहे, अशा प्रकल्पांची निवड तज्ञांच्या समितीमार्फत केली जाते व समितीने शिफारस केलेल्या प्रकल्पांचे पेटेंट मिळविण्यासाठी मंडळामार्फत

प्रयत्न केले जातात. पेंटर सादर करून ते मिळण्यासाठी लागणाऱ्या खर्चाची वित्तीय तरतुद मंडळाने केली आहे. सदर पेटेंटस विद्यार्थी, संस्था व मंडळ यांचेमार्फत संयुक्तपणे फाईल करण्यात येतात.

- **स्पोकन ट्युटोरियल प्रकल्प (IIT मुंबई सोबत सामंजस्य करार)**

स्पोकन ट्युटोरियल प्रकल्प हा 'दि नॅशनल मिहान ऑन एज्युकेशन थ्रू आय ई टी' मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार यांचा अनुदानीत प्रकल्प असून IIT मुंबई यांचेमार्फत चालविला जातो. या प्रकल्पाचा मोफत लाभ तंत्रनिकेतनातील विद्यार्थ्यांना होण्यासाठी मंडळाने IIT मुंबई या संस्थेबरोबर सामंजस्य करार केला आहे. या प्रकल्पांच्या माध्यमातून फ्री आणि ओपन सोअर्स प्रणाली व त्यांचा उपयोग याचे प्रशिक्षण द्रक-श्राव्य माध्यमातून विद्यार्थ्यांना दिले जाते. या प्रकल्पाअंतर्गत अणुविद्युत व दुरसंचार अभियांत्रिकी शाखेच्या विद्यार्थ्यांना Kicad व Ascad, स्थापत्य आणि यंत्र अभियांत्रिकी शाखेच्या विद्यार्थ्यांना Open FOAM, स्थापत्य अभियांत्रिकी शाखोच्या विद्यार्थ्यांना Inscape, संगणक आणि माहिती तंत्रज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना C, C++, Java, PHP, MY SQL तसेच टेक्सटाईल, गारमेंट टेक्नॉलॉजी आणि फॅशन टेक्नॉलॉजी शाखेच्या विद्यार्थ्यांना Animation & Graphics इत्यादी विषय / प्रणालींचे प्रशिक्षण दिले जाते.

- **शिका व कमवा योजना**

राज्य शासनाच्या शिका व कमवा या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबर अर्थार्जन प्राप्त होते. इंडस्ट्रियल ड्रग सायन्स, रिटेल व्यवस्थापन, सप्लाय चैन व लॉजिस्टिक्स व्यवस्थापन तसेच हॉस्पिटॅलिटी व्यवस्थापन हे पदविका अभ्यासक्रम मंडळामार्फत राबविले जातात. शिक्षण चालू असताना काही काळासाठी विद्यार्थांना कारखान्यांमध्ये प्रशिक्षण आयोजित करुन या काळात विद्यावेतनाच्या स्वरुपात अर्थार्जन प्राप्त करण्याची संधी या योजनेअंतर्गत विद्यार्थांना प्राप्त होते.

- **शिष्यवृत्ती**

सन २००७-०८ पासून मंडळामार्फत दरवर्षी हुशार, होतकरु व गरजू विद्यार्थ्यांना रु. ७०००/- प्रति विद्यार्थी याप्रमाणे शिष्यवृत्ती देण्यात येते.

- **प्रमाणपत्रे** : विद्यार्थ्यांना मंडळामार्फत त्यांच्या मागणीनुसार पुढील प्रमाणपत्र प्रदान करण्यात येतात.

  १. ट्रान्स्क्रिप्ट प्रमाणपत्र (Transcript Certificate)

  २. समकक्षता प्रमाणपत्र (Equivalence Certificate)

  ३. स्थलांतरण प्रमाणपत्र (Migration Certificate)

  ४. बाह्यराज्य पदविका प्रमाणपत्र: (Other state diploma Certificate) :

  a) समकक्षता प्रमाणपत्र (Course Equivalence Certificate)

  b) उच्च माध्यमिक समकक्षता प्रमाणपत्र (HSC Equivalence Certificate)

- **<u>सर्वोत्तम प्रयोगशाळा पुरस्कार</u>**

मंडळाशी संलग्नित संस्थांमधील प्रयोगशाळा अद्यावत असण्यासाठी व त्यांचा दर्जा सुधारण्यासाठी मंडळामार्फत उत्कृष्ट प्रयोगशाळेस पुरस्कार दिले जाते व दरवर्षी महाराष्ट्र राज्यातील १० सर्वोत्तम प्रयोगशाळांची निवड करुन त्यांना प्रत्येकी ५०,००० रुपयांचे पारितोषिक व प्रशस्तिपत्रक दिले जाते. हा उपक्रम मंडळामार्फत २०१४-१५ पासुन चालु करण्यात आला आहे. मंडळामार्फत केलेल्या शैक्षणिक अवेक्षणामध्ये संस्थांच्या ज्या विभागांना 'उत्कृष्ट' (Excellent) दर्जा प्राप्त झाला आहे, असे मंडळाशी

संलग्नित संस्थेचे विभाग या स्पर्धेसाठी पात्र ठरतात. यामध्ये प्रयोगशाळेसाठीची उपलब्ध जागा, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकापेक्षा अधिक उपकरणांची उपलब्धता व त्यांचा जास्तीत जास्त वापर, सुरक्षेच्या उपायांची अंमलबजावणी, पर्यावरण विषयांचे पालन तसेच उर्जा बचतीची उपाययोजना या बाबींच्या अनुषंगाने सर्वोत्तर कामगिरी करणाऱ्या प्रयोगशाळेस उत्कृष्ट प्रयोगशाळा पुरस्कार मंडळामार्फत दिला जातो.

- **<u>ऑनलाईन सुविधा</u>**

मंडळाच्या विवीध उपक्रमांच्या कामामध्ये सुसुत्रता येण्यासाठी तसेच वेळ व कागद यांची बचत होण्याच्या उद्देशाने मंडळाने माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करून कामकाजामध्ये ऑनलाईन सुविधा वापरण्यावर भर दिला आहे. संस्थांचे संलग्निकरण व विद्यार्थी नोंदणी ही कामे करण्यासाठी संगणक प्रणाली विकसीत केली आहे. परीक्षा अर्ज स्विकृती, परीक्षा केंद्र व मुल्यांकन केंद्र ठरविणे, परीक्षा वेळापत्रक व परीक्षा प्रवेशपत्र वाटप, परीक्षकांमार्फत गुणपत्रिका सादरीकरण तसेच निकाल घोषित करणे या परीक्षेसंबंधातील बाबीसाठी ऑनलाईन सूविधा उपलब्ध करून दिली आहे. तसेच संस्थांचे अवेक्षण, शिक्षकीय पदांच्या मान्यता देणे हे उपक्रम व शिक्षकांच्या प्रशिक्षणाचे प्रस्तावदेखील ऑनलाईन सुविधांद्वारे स्विकारले जातात. मंडळामार्फत आयोजित तांत्रिक पेपर सादरीकरण, तांत्रिक प्रश्नमंजुषा, प्रकल्प प्रदर्शन, सर्वोत्तम प्रयोगशाळा पुरस्कार इत्यादी विविध स्पर्धांचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने मागविले जातात. मंडळामार्फत विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीचे अर्ज मागविणे तसेच मंडळाच्या कामकाजाबाबत सुधारणा व अभिप्राय सुचविण्यासाठी देखील मंडळामार्फत ऑनलाईन सुविधेचा वापर केला जातो. तसेच मंडळामार्फत या ऑनलाईन प्रणालींची सुरक्षा तपासणी वेळोवेळी करुन घेतली जाते.

- **<u>उद्योग – संस्था समन्वय</u>**

उद्योग व संस्था यांचेमधील समन्वय अधिक हितपुर्ण व प्रभावी करण्यासाठी मंडळाने HUB & SPOKE MODEL ही योजना सुरु केली आहे. प्रत्येक विभागातील इंडस्ट्री व संस्थांच्या ग्रुपना जोडून या ग्रुपमार्फत अधिक प्रभावीपणे उद्योग – संस्था समन्वय साधण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. प्रत्येक विभागातून एका संस्थेची 'पॅट्रन संस्था' म्हणून तर एका उद्योगाची 'चॅंपियन उद्योग' म्हणून निवड केली जाते व त्यांचे माध्यमातून समन्वयाचे काम पार पाडले जाते. मुंबई विभागाकरीता 'लार्सन अँड टुब्रो' या कंपनीची 'चॅंपियन उद्योग' म्हणून व 'लार्सन अँड टुब्रो' तंत्रनिकेतन या संस्थेची 'पॅट्रन संस्था' म्हणून निवड करण्यात आलेली आहे.

पुणे विभागाकरीता 'टाटा मोटर्स लि.' या कंपनीची 'चॅंपियन उद्योग' म्हणून व 'कुसरो वाडीया तंत्रनिकेतन' या संस्थेची `पॅट्रन संस्था' म्हणून निवड करण्यात आलेली आहे.

नागपूर विभागाकरीता 'महिंद्रा अँड महिंद्रा' या कंपनीची 'चॅम्पियन उद्योग' म्हणून व 'शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर' या संस्थेची 'पॅट्रन संस्था' म्हणून निवड करण्यात आलेली आहे.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थी व शिक्षकांकरिता औद्योगिक भेटी, उद्योजकांची तज्ञ व्याख्याने / मार्गदर्शन, उद्योगधंद्यांवर आधारीत विविध प्रकल्प, औद्योगिक प्रशिक्षण इत्यादी उपक्रमांचे आयोजन केले जाते.

इतर उद्योगसमुहाबरोबर समन्वय वाढविण्यासाठी अशाच प्रकारे आणखी सामंजस्य करार करण्यासाठी मंडळामार्फत प्रयत्न सुरू आहेत.

- **<u>कौशल्य विकास केद्र (हब ॲन्ड स्पोक अंतर्गत)</u>**

मंडळातर्फे २०१४-१५ पासून ग्रामीण भागातील बेरोजगार, अल्पशिक्षित व अशिक्षित युवकांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने व त्यांना स्वतंत्र व्यवसाय चालू करण्याची क्षमता त्यांचेमध्ये निर्माण

होण्याकरीता महाराष्ट्र कौशल्य विकास केंद्र 'शासकीय तंत्रनिकेतन, अंबड' जि. जालना येथे स्थापित केले आहे. या केंद्रामध्ये सध्या १५ राष्ट्रीय कौशल्य विकास प्राधिकरण (NSDC) मान्यताप्राप्त विविध अभ्यासक्रम राबविण्यात येत आहेत. हे अभ्यासक्रम कारखान्यांना ज्या कुशल मनुष्यबळाची कमतरता जाणवते अशा वाहन उद्योग, आरोग्य सेवा, सुरक्षा आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्राशी संबंधित आहेत. आतापर्यंत ३५०० विद्यार्थी या उपक्रमांतर्गत प्रशिक्षित झाले असून त्यातील अनेक विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध करुन देण्यात आला असून काही विद्यार्थ्यांनी स्वत:चा व्यवसायदेखील चालू केलेला आहे. शासकीय तंत्रनिकेतन,अंबड येथील केंद्र हे हब ॲन्ड स्पोक मॉडेलअंतर्गत हब म्हणून कार्यरत आहेत.

- **स्पोक केंद्र**

मंडळाने महाराष्ट्र कौशल्य विकास केंद्राचे स्पोक केंद्र शासकीय दुरशिक्षण तंत्रनिकेतन, पुणे येथे नुकतेच स्थापित केले असून त्या केंद्रामध्ये सध्या (PMKVY) योजनेअंतर्गत NSDC चे ५ कौशल्य अभ्यासक्रम सुरु करण्यात आले आहेत. हे केंद्र चालविण्यासाठी NYCS, पुणे या संस्थेबरोबर मंडळाने सामंजस्य करार केला आहे. यासाठी मंडळाने आवश्यक उपकरणांची उपलब्धता करून दिली आहे. या केंद्राव्दारे गरजू विद्यार्थ्यांना बायोमेट्रिक डाटा ऑपरेटर, डाटा एन्ट्री ऑपरेटर, मोबाईल दुरूस्ती तंत्रज्ञ, CCTV तंत्रज्ञ आणि संगणकीय व उपकरणे तंत्रज्ञ हे अभ्यासक्रम चालू केले आहेत.

- **कौशल्य पात्र विद्यार्थ्यांकरीता कौशल्य विकास कार्यक्रम.**

मंडळाच्या अखत्यारीत असलेल्या विविध तंत्रनिकेतनामध्ये प्रधानमंत्री कौशल्य विकास योजने अंतर्गत (PMKVY) राष्ट्रीय कौशल्य विकास प्राधिकरण (NSDC) यांच्या मान्यताप्राप्त संस्थांकडून कौशल्य सेतू- कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्याचा उपक्रम घेण्यात आलेला आहे.

कौशल्य सेतू- कौश्यल्य विकास कार्यक्रम राज्यातील दहावी परीक्षेत कौशल्य विकासपात्र व शाळा सोडलेल्या विद्यार्थ्यांकरिता रोजगाराभिमुख योजना आहे. हा महत्वाकांक्षी उपक्रम शिक्षणाच्या मुख्य प्रवाहातून भरकटलेल्या युवकांना औद्योगिक दृष्ट्या सक्षम करण्याकरिता व त्यांना स्वतंत्र व्यवसाय चालू करण्याकरिता प्रशिक्षित करण्यासाठी राबविण्यात येत आहे.

या योजनेअंतर्गत मंडळाकडून ऑपरेटर्स व तंत्रनिकेतने यांची निवड करण्यात आली असून आतापर्यंत 107 संस्थांनी ऑपरेटर्स सोबत सामंजस्य करार केले आहेत.

- **पूर्वोत्तर राज्यांच्या युवकांसाठी कौशल्य विकास कार्यक्रम.**

उत्तरपूर्वी क्षेत्र विकास मंत्रालय, भारत सरकार यांचेमार्फत उत्तरपूर्व राज्यांमधील बेरोजगार युवकांकरिता रोजगाराभिमुख कौशल्य विकास अभ्यासक्रम राबविण्याची योजना अंमलात आली असून त्याकरिता मंडळाला 45 लक्ष रुपयांचे अनुदान प्राप्त झाले आहे. या योजनेअंतर्गत उत्तरपूर्व राज्यामधील 120 युवकांना प्रशिक्षित करण्याचे काम मंडळाने हाती घेतले असून महाराष्ट्र कौशल्य विकास केंद्र, अंबड येथे उत्तरपूर्व तसेच महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण चालू आहे.

- **<u>उत्कृष्ट कामगिरी</u>**

  - उत्कृष्ट अभ्यासक्रम, प्रभावी अंमलबजावणी, शैक्षणिक अवेक्षण, शिस्तबद्ध परीक्षा पद्धती ही मंडळाची क्वॉलिटी पॉलिसी असून याकरिता मंडळाला **ISO ९००१ : २००८** हे प्रमाणपत्र मिळाले आहे. परिक्षा घेणे व निकाल घोषित करणे तसेच प्रमाणपत्र प्रदान करणे या बाबी अत्यंत पारदर्शीपणे व सचोटीपूर्ण राबविण्यात येत असल्यामुळे मंडळाला **IEC २७००१ : २०१३** हे सिक्युरीटी प्रमाणपत्र मिळाले आहे.
  - मंडळाला खालील ई गव्हर्नस कार्यप्रणाली बाबत २०१५ साठीचे **SKOCH** उत्कृष्टतेचे प्रमाणपत्र मिळाले आहे.

    **ऑनलाईन ॲकॅडेमिक मॉनिटरिंग सिस्टम**

    **ऑनलाईन एन्रोलमेंट ॲन्ड ऑनलाईन एक्झामिनेशन फॉर्म फिलींग सिस्टम**

    **ऑनलाईन व्हेरिफिकेशन ॲन्ड रि- ॲसेसमेंट सिस्टम**

    **ई-मार्कशीट सिस्टम**

## नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी :-

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी करण्यास कटिबध्द आहे. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ आपल्या अधिपत्याखालील सेवा कर्तव्य भावनेने व कार्यतत्परतेने उपलब्ध करुन देण्याची हमी देत आहे. या सेवा पुरविताना नागरिकांना सौजन्यपूर्ण वागणूक देण्याची जबाबदारी मंडळातील प्रत्येक अधिकारी / कर्मचाऱ्यांची राहील.

## मंडळामार्फत नागरिकांना खालीलप्रमाणे सेवा पुरविल्या जातात :-

## परीक्षा विभाग :-

| अ. क्र. | सेवांचा तपशिल | सेवा पुरविण्याकरीता आवश्यक कागदपत्रे | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचे नांव व पद | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिका-याचे नांव व पद |
|---|---|---|---|---|---|
| १. | दुय्यम / ट्रिपलीकेट गुणपत्रिका (Duplicate / Triplicate Marksheet) | १. स्वयं घोषणापत्र<br>२. गुणपत्रिकेच्या स्वयंसाक्षांकित छायांकित प्रत<br>३. पोलीस तक्रारीची नोंद<br>४. विहित शुल्क धनादेश रु.३००/- प्रति गुणपत्रिका<br>५. स्वयंसाक्षांकित घोषणापत्र | डॉ. चं. डि. कापसे, उपसचिव (तां)<br>श्रीमती उ.म. हिरे, प्रणाली विश्लेषक<br>श्री. ए.एम. दंडवते सहा.सचिव (तां)<br>श्री. अ. पुं. राणे, अधीक्षक | १५ दिवस | डॉ. विनोद म. मोहितकर, सचिव |
| २. | दुय्यम / ट्रिपलीकेट प्रमाणपत्र (Duplicate / Triplicate Certificate) | १. स्वयं घोषणापत्र<br>२. प्रथम सत्रापासून अंतिम सत्रापर्यंतच्या उत्तीर्ण गुणपत्रिकेच्या स्वयंसाक्षांकित छायांकित प्रत<br>३. पोलीस तक्रारीची नोंद<br>४. विहित शुल्क रु. ४००/-<br>५. स्वयंसाक्षांकित घोषणापत्र | डॉ. चं. डि. कापसे, उपसचिव (तां)<br>श्रीमती उ.म. हिरे, प्रणाली विश्लेषक<br>श्री. ए.एम. दंडवते सहा.सचिव (तां)<br>श्री. अ. पुं. राणे, अधीक्षक | १५ दिवस | डॉ. विनोद म. मोहितकर, सचिव |
| ३. | गुणपत्रिका पडताळणी (Mark sheet Verification) | गुणपत्रिकेची छायांकित प्रत व रु. १५०/- प्रति गुणपत्रिका | डॉ. चं. डि. कापसे, उपसचिव (तां)<br>श्रीमती उ.म. हिरे, प्रणाली विश्लेषक<br>श्री. अ. पुं. राणे, अधीक्षक | ३० दिवस<br>For Institute Bulk Verification २ months | डॉ. विनोद म. मोहितकर, सचिव |
| ४. | प्रमाणपत्र पडताळणी (Certificate Verification) | प्रमाणपत्रिकेची छायांकित प्रत व रु. २५०/- प्रति गुणपत्रिका | डॉ. सी.डी. कापसे उपसचिव (तां)<br>श्रीमती यू.एम. हिरे प्रणाली विश्लेषक | ३० दिवस | डॉ. विनोद म. मोहितकर, सचिव |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५. | गुणपत्रिका प्रमाणिकरण (Authentication of Mark sheet) | गुणपत्रिका (मूळ / छायांकित)<br>रु. १००/- (एक प्रत)<br>रु. ५०/- (पुढील प्रत्येक प्रतीसाठी) | डॉ. चं. डि. कापसे, उपसचिव (तां)<br>श्रीमती उ.म. हिरे, प्रणाली विश्लेषक<br>श्री. अ. पुं. राणे, अधीक्षक | ३० दिवस | डॉ. विनोद म. मोहितकर, सचिव |
| ६. | प्रमाणपत्र प्रमाणिकरण (Authentication of certificate) | पदविका प्रमाणपत्र (मूळ / छायांकित)<br>रु.२००/- (एक प्रत)<br>रु. ५०/- (पुढील प्रत्येक प्रतीसाठी) | डॉ. चं. डि. कापसे, उपसचिव (तां)<br>श्रीमती उ.म. हिरे, प्रणाली विश्लेषक<br>श्री. अ. पुं. राणे, अधीक्षक | ३० दिवस | डॉ. विनोद म. मोहितकर, सचिव |
| ७. | विद्यार्थ्यांची नोंदणी (Enrollment) | १. शैक्षणिक अर्हता गुणपत्रिका<br>२. मान्यताप्राप्त गुणवत्ता यादी<br>३. समकक्षता प्रमाणपत्र (लागू असल्यास)<br>४. सर्टिफिकेटस ऑफ बॅकलॉग (लागू असल्यास) | डॉ. चं. डि. कापसे, उपसचिव (तां)<br>श्री. ए.एम. दंडवते सहा.सचिव (तां)<br>श्रीमती दि. दि. चंदे प्रणाली विश्लेषक | वेळोवेळी निर्गमित होणा-या परिपत्रकानुसार | डॉ. विनोद म. मोहितकर, सचिव |
| ८. | विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज | १. नोंदणी (Enrollment) क्रमांक<br>२. Exemption Certificate (लागु असल्यास)<br>३. सर्टिफिकेटस ऑफ बॅकलॉग (लागू असल्यास)<br>४. विहित परीक्षा शुल्क | डॉ. चं. डि. कापसे, उपसचिव (तां)<br>श्रीमती दि. दि. चंदे प्रणाली विश्लेषक<br>श्री. ए.एम. दंडवते सहा.सचिव (तां) | वेळोवेळी निर्गमित होणा-या परिपत्रकानुसार | डॉ. विनोद म. मोहितकर, सचिव |
| ९. | परीक्षा निकालातील दुरुस्त्या – आरएचआर, एलएसपी / डब्ल्यूएफएलएस / डब्ल्यूएफएलवाय, इ. | १. मागील परीक्षांची गुणपत्रिका<br>२. Exemption Certificate (लागू असल्यास)<br>३. गुणपत्रिकेत नमूद नसलेल्या गुणांबाबत संस्थेकडून माहिती | डॉ. चं. डि. कापसे, उपसचिव (तां)<br>श्री. अ. पुं. राणे, अधीक्षक | १५ दिवस | डॉ. विनोद म. मोहितकर, सचिव |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १०. | नाव दुरुस्ती (Name Correction) | विद्यार्थ्यांच्या एस.एस.सी. च्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत, सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालयाने मंजूर केलेल्या प्रवेशित यादीची साक्षांकित केलेली छायांकित प्रत, विहित शुल्क रु. २००/- प्रत्येक गुणपत्रिकांनुसार रु. २००/- प्रमाणपत्र तसेच विद्यार्थ्यांने सर्व सत्र / वर्ष उत्तीर्ण होऊन पदविका प्रमाणपत्र प्राप्त केले असल्यास संबंधित संस्थेस रु. १,०००/- अतिरिक्त दंड भरावा लागेल आणि ज्या गुणपत्रिका व प्रमाणपत्रावर नावात दुरुस्ती करावयाची असेल ते सर्व मुळ गुणपत्रिका व प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. | डॉ. चं. डि. कापसे, उपसचिव (तां)<br><br>श्री. अ. पुं. राणे, अधीक्षक | १५ दिवस | डॉ. विनोद म. मोहितकर, सचिव |

## अभ्यासक्रम विभाग :-

| अ. क्र. | सेवांचा तपशील | सेवा पुरविण्याकरीता आवश्यक कागदपत्रे | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचे नाव व पद | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नाव व पद |
|---|---|---|---|---|---|
| १. | समकक्षता प्रमाणपत्र प्रदान करणे | खालील मुळ व साक्षांकित छायाप्रती -<br>१. प्रथम ते अंतिम सत्र/वर्षाच्या गुणपत्रिका<br>२. प्रोव्हीजनल / अंतिम पदविका प्रमाणपत्र<br>३. संस्था सोडल्याचा दाखला<br>४. संबंधित मंडळाचे मायग्रेशन सर्टिफिकेट | १. श्री. उ. टे. नागदेवे, उपसचिव (तां)<br>२. श्रीमती मि.बा. शिरसाट, प्रणाली विश्लेषक<br>३. श्री. वि. क. भादेकर, अधीक्षक | ७ दिवस | डॉ. विनोद म. मोहितकर सचिव |
| २. | Transcript प्रदान करणे | खालील मुळ व साक्षांकित छायाप्रती -<br>१. प्रथम ते अंतिम सत्र / वर्षाच्या उत्तीर्ण गुणपत्रिका<br>२. प्रोव्हीजनल / अंतिम पदविका प्रमाणपत्र<br>३. संस्था सोडल्याचा दाखला | १. श्री. उ. टे. नागदेवे, उपसचिव (तां)<br>२. श्रीमती मि.बा. शिरसाट, प्रणाली विश्लेषक<br>३. श्री. वि.क. भादेकर, अधीक्षक | २१ दिवस | डॉ. विनोद म. मोहितकर सचिव |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३. | No Objection प्रमाणपत्र प्रदान करणे | खालील मुळ व साक्षांकित छायाप्रती<br>१. अंतिम सत्राची गुणपत्रिका<br>२. अंतिम पदविका प्रमाणपत्र<br>३. संस्था सोडल्याचा दाखला | १. श्री. उ. टे. नागदेवे, उपसचिव (तां)<br>२. श्रीमती मि.बा. शिरसाट, प्रणाली विश्लेषक<br>३. श्री. वि.क. भादेकर, अधीक्षक | २१ दिवस | डॉ. विनोद म. मोहितकर सचिव |
| ४. | मंडळाचा अभ्यासक्रम पुर्ण केलेल्या विद्यार्थ्यांस पुढील शिक्षणासाठी Migration प्रमाणपत्र प्रदान करणे | खालील मुळ व साक्षांकित छायाप्रती<br>१. प्रथम ते अंतिम सत्र / वर्षाच्या उत्तीर्ण गुणपत्रिका<br>२. प्रोव्हीजनल / अंतिम पदविका प्रमाणपत्र<br>३. संस्था सोडल्याचा दाखला | १. श्री. उ. टे. नागदेवे, उपसचिव (तां)<br>२. श्रीमती मि.बा. शिरसाट, प्रणाली विश्लेषक<br>३. श्री. अ. शं. चाळके, अधीक्षक | २१ दिवस | डॉ. विनोद म. मोहितकर सचिव |
| ५. | मंडळाशी संलग्नित विनाअनुदानित संस्थांतील शिक्षकीय पदांना मान्यता देणे | ऑनलाईन पध्दतीने | १. श्री. उ. टे. नागदेवे, उपसचिव (तां)<br>२. श्रीमती मि.बा. शिरसाट, प्रणाली विश्लेषक<br>३. श्री. वि.क. भादेकर, अधीक्षक | ३ महिने | डॉ. विनोद म. मोहितकर सचिव |
| ६. | मंडळाशी संलग्नित संस्थांचे शैक्षणिक अवेक्षण (Academic Monitoring) | ऑनलाईन पध्दतीने | १. श्री. उ. टे. नागदेवे, उपसचिव (तां)<br>२. श्री. अ. साहू सहा. सचिव (तां.) | शैक्षणिक वेळापत्रकानुसार | डॉ. विनोद म. मोहितकर सचिव |
| ७. | निवड समितीने शिफारस केलेल्या शिक्षकांना MSBTE ची मान्यता देणे. | ऑनलाईन पध्दतीने | १. श्री. उ. टे. नागदेवे, उपसचिव (तां)<br>२. श्रीमती मि.बा. शिरसाट, प्रणाली विश्लेषक<br>३. श्री. वि.क. भादेकर, अधीक्षक | ३ महिने | डॉ. विनोद म. मोहितकर सचिव |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | AICTE मान्यता प्राप्त संस्थेस ना-हरकत प्रमाणपत्र,<br>१. प्रवेशक्षमतेत घट<br>२. संस्था स्थानांतरण<br>३. संस्थेच्या नावात / पत्त्यात बदल<br>४. अभ्यासक्रम बंद | १. नोंदणीकृत हमीपत्र रु. १००/-च्या स्टॅम्पपेपरवर<br>२.संस्थेचा/व्यवस्थापन ठराव मान्यतेचे पत्र<br>३. AICTE नमुनापत्र प्राचार्याच्या स्वाक्षरीसह. | १. श्री. उ. टे. नागदेवे, उपसचिव (तां)<br>२. डॉ. एस.जी.देशपांडे, सहा. सचिव (तां.)<br>३. श्रीमती एस. एस. राणे सहा. सचिव (अतां.) | ७ दिवस | डॉ. अभय वाघ संचालक |

## <u>एमएससीआयटी विभाग :-</u>

| अ. क्र. | सेवांचा तपशील | सेवा पुरविण्याकरीता आवश्यक कागदपत्रे | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचे नाव व पद | सेवा पुरविण्याची विहित मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नाव व पद |
|---|---|---|---|---|---|
| १. | दुय्यम / ट्रिपलीकेट प्रमाणपत्र (Duplicate / Triplicate Certificate) | १. प्रमाणपत्राची स्वयंसाक्षांकित छायांकित प्रत<br>२. स्वयं घोषणापत्र<br>३. <u>विहित शुल्क</u> धनादेश रु.२००/-<br>४. स्वयंसाक्षांकित घोषणापत्र | १. डॉ. चं. डि. कापसे, उपसचिव (तां)<br>२. श्रीमती स्वा.प्रे. बडगुजर सहा. सचिव (तां.) | १५ दिवस | डॉ. विनोद म. मोहितकर, सचिव |
| २. | नाव दुरुस्ती | १. प्रमाणपत्राची मूळ प्रत<br>२. साक्षांकित छाया ओळखपत्र<br>३. एसएससी/एचएससी/आठवी इयत्ता /चौथी इयत्ताची साक्षांकित गुणपत्रिका / प्रमाणपत्र<br>४. <u>विहित शुल्क</u> धनादेश रु.६००/- | १. डॉ. चं. डि. कापसे, उपसचिव (तां)<br>२. श्रीमती स्वा.प्रे. बडगुजर सहा. सचिव (तां.) | १५ दिवस | डॉ. विनोद म. मोहितकर, सचिव |

**मंडळातील संबंधित विभागातील माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी याबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे. :-**

| अ.क्र. | विभाग | अधिकाऱ्याचे नांव व पद | पद |
|---|---|---|---|
| १. | अभ्यासक्रम विभाग | श्री. उ. टे. नागदेवे, उपसचिव (तां.) | अपिलीय अधिकारी |
| | | श्रीमती शु.स. राणे, सहाय्यक सचिव (अतां.) | जन माहिती अधिकारी |
| २. | परीक्षा विभाग | डॉ. चं. डि. कापसे, उपसचिव (तां ) | अपिलीय अधिकारी |
| | | श्री. अ. मुं. दंडवते, सहाय्यक सचिव(तां.) | जन माहिती अधिकारी |
| ३. | आस्थापना विभाग | डॉ. चं. डि. कापसे, उपसचिव (तां ) | अपिलीय अधिकारी |
| | | श्री. न.वि. कांबळी, सहाय्यक सचिव (अतां.) | जन माहिती अधिकारी |
| ४. | लेखा विभाग | डॉ. चं. डि. कापसे, उपसचिव (तां ) | अपिलीय अधिकारी |
| | | श्रीमती वि. दि. संखे, लेखाधिकारी | जन माहिती अधिकारी |
| ५. | भांडार विभाग | श्री. उ. टे. नागदेवे, उपसचिव (तां.) | अपिलीय अधिकारी |
| | | श्रीमती स्वा.प्रे. बडगुजर, सहाय्यक सचिव(तां.) | जन माहिती अधिकारी |
| ६. | एम.एस.सी.आय.टी. विभाग | डॉ. चं. डि. कापसे, उपसचिव (तां ) | अपिलीय अधिकारी |
| | | श्रीमती स्वा.प्रे. बडगुजर, सहाय्यक सचिव(तां.) | जन माहिती अधिकारी |
| ७. | आय.टी. विभाग | श्री. सं. रा. आहेर, उपसचिव (तां.) | अपिलीय अधिकारी |
| | | श्री. आ. शि. आबक, सहाय्यक सचिव(तां.) | जन माहिती अधिकारी |

## महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अध्यादेशांतर्गत अधिसूचित करण्यात आलेल्या मंडळामार्फत पुरविण्यात येणा-या सेवा

महाराष्ट्र राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अध्यादेशांतर्गत अधिसूचित करण्यात आलेल्या मंडळामार्फत पुरविण्यात येणा-या लोकसेवा, कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपील प्राधिकारी आणि द्वितीय अपील अधिकारी खालीलप्रमाणे आहेत. सदरहू कायदयांतर्गत मंडळास अधिसूचित केलेल्या उपरोक्त सेवा मेसर्स महाऑनलाईन यांच्याशी समन्वय साधून ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | लोकसेवेचा तपशील | लोकसेवा पुरविण्यासाठी विहित केलेली कालमर्यादा | पदनिर्देशित अधिका-याचे पदनाम | प्रथम अपिल अधिका-याचे पदनाम / कार्यालयीन पत्ता / दूरध्वनी /क्र. ईमेल | द्वितीय अपिल अधिका-याचे पदनाम / कार्यालयीन पत्ता / दूरध्वनी क्र. / ईमेल |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | दुय्यम गुणपत्रिका / प्रमाणपत्र (Duplicate Marksheet / Certificate) | १५ दिवस | प्रणाली विश्लेषक (निकाल विभाग) E-mail - umhire@ msbte.com | उपसचिव (तां), (निकाल विभाग) E-mail - cdkapse@msbte.com | सचिव, E-mail - secretary@msbte.com |
| २. | ट्रान्सक्रीप्ट (Transcript) | २१ दिवस | प्रणाली विश्लेषक (अभ्यासक्रम विभाग) E-mail - mbshirsat@ msbte.com | उपसचिव (तां), (अभ्यासक्रम विभाग) E-mail - utnagdeve@msbte.com | सचिव, E-mail - secretary@msbte.com |
| ३. | मायग्रेशन प्रमाणपत्र (Migration Certificate) | २१ दिवस | प्रणाली विश्लेषक (अभ्यासक्रम विभाग) E-mail - mbshirsat@ msbte.com | उपसचिव (तां), (अभ्यासक्रम विभाग) E-mail - utnagdeve@msbte.com | सचिव, E-mail - secretary@msbte.com |